# माध्यमिक शिक्षक संघ बैठकीचे इतिवृत्त दि.०९/१०/२०१९

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | सेवापुस्तके तयार नसलेल्या शाळांवर (संस्थेवर) कोणत्या स्वरुपाची कारवाई अपेक्षित आहे? समयबध्द स्वतंत्र मोहिम राबविण्यात कोणती अडचण आहे? | संस्था/शाळा मुख्याध्यापक यांचेकडून शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नेमणूक आदेशाची प्रत, वैयक्तिक मान्यता आदेशाची प्रत, सेवा दाखले, सेवाज्येष्ठता यादी इ. अशा अनेक प्रकारच्या सेवाविषय कागदपत्रे उपलब्ध करुन दिली जात नाहीत. तसेच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियुक्ती होवून बराच कालावधी उलटनही त्याचे सेवापुस्तक अद्यापपर्यंत तयार केले जात नसल्याबाबत संघटना प्रतिनिधीकडून सांगण्यात आले.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तक, सेवाज्येष्ठता यादी तसेच दुबार सेवापुस्तक व इतर अनुषंगीक सेवाविषयक बाबींची कार्यवाही दि. ३१ मे २०२० अखेर पूर्ण होईल याबाबतचे नियोजन करावे. याबाबत शिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळा मुख्याध्यापक यांना परिपत्रकान्वये याबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात. याबाबत शिबीरांचे आयोजन करण्यात यावे. शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना दरमहा वेतन देयके स्विकारताना उपरोक्त कार्यवाहीबाबत काय प्रगती झाली याबाबत दरमहा नियमित आढावा घेणेबाबतच्या सूचना द्याव्यात.<br>उपरोक्त कार्यवाही दि. ३१ मे २०२० अखेर पूर्ण होण्यासाठी संघटनेनेदेखील शिक्षणाधिकारी तसेच अधीक्षक, वेतन पथक यांचेसोबत समन्वय साधून उपरोक्त कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडण्याबाबत सहकार्य करावे. | शिक्षणाधिकारी / वेतनपथक स्तरावर | -- |
| २. | मा. शिक्षण उपसंचालकसो, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी २५ नोव्हेंबर २००२ रोजी आदेशित केलेल्या आदर्श पारदर्शक कार्यालयीन कार्यपध्दतीचा अंमल होत नसलेबाबत. | विभागातील सर्व दुय्यम कार्यालयांनी 'नागरिकांची सनद' मध्ये ठरवून दिलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर कार्यालयाकडील दि. २५ नोव्हेंबर २००२ रोजी आदेशित केलेल्या आदर्श पारदर्शक कार्यालयीन कार्यपध्दतीची अंमलबजावणी करावी. | सर्व दुय्यम कार्यालये | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | ज्या संस्था/शाळा शासनाचे कोणतेच आदेश मानीत नाहीत त्याबाबतीत काय करता येईल. संबंधीत शिक्षक कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडीतून कशी सुटका करता येईल या संदर्भा शासन निर्णय दि. १४/०२/१९७४, ०६/०३/२०१० व ०१/०३/२०११ च्या आदेशानुसार कार्यवाही होण्यात कोणत्या अडचणी आहेत. निर्णय कार्यवाही संदर्भात कार्यालयाचे अधिकार व अंमलबजावणी बाबतची भूमिका स्पष्ट व्हावी. | मनमानी कारभार करणाऱ्या शाळांवर प्रशासन नियुक्तीबाबत कार्यवाही करणेची शिफारस या कार्यालयाला करता येईल.<br>शिक्षणाधिकारी यांनी सखोल चौकशी करुन अहवालासह प्रस्ताव या कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करावा. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४ | अतिरिक्त शिक्षकांची लक्षणीय संख्या, समावेशन न झालेल्यांची संख्या समयोजनास नकार देणाऱ्या शाळा आणि त्याठिकाणी रिक्त पदावर होणाऱ्या शिक्षण सेवकांच्या नेमणूका व मान्यता या बाबतीत शासनाचे धोरण स्पष्ट व्हावे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडील याचिका क्र. ५५९४/२०१४ चे कामी दिनांक १४/१०/२०१४ नुसार कार्यवाही व्हावी. | अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत शासन परिपत्रक दि. १० जून २००५ नुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे. असे न होता सेवाज्येष्ठ शिक्षकांना अतिरिक्त ठरविले गेल्याचे काही उदाहरणे आहेत. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अशी काही प्रकरणे असल्याचे संघटनेकडून नमूद करण्यात आले.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी अतिरिक्त शिक्षकांच्या बाबतीत महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली २६ (१)(२)(३) नुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ५ | आर.टी.ई. कायदा राज्यातल्या सी.बी.एस.ई अथवा आय.सी.एस. अभ्यासक्रम राबविणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांना लागू आहे किंवा कसे? सदर शाळावर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रणआहे किंवा कसे? सदर शाळांची खात्यामार्फत वार्षिक तपासणी होते किंवा कसे ? | शासन निर्णय दि. २० जून २०१२ मध्ये याबाबतचे धोरण स्पष्ट केले आहे. | -- | -- |
| ६ | केंद्र शासन पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजनेंतर्गत काम करणाऱ्या शिक्षकांचे नियमित वेतन मिळकत नसलेबाबत शासकीय धोरण स्पष्ट व्हावे. | कोल्हापूर विभागामध्ये एकूण ५ शाळा आहेत. दरवर्षी अशा शिक्षकांना मान्यता घ्यावी लागते. मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडून प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयास पाठविला जातो. त्यानंतर मान्यता देण्यात येते.<br>केंद्र शासन पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजनेंतर्गत काम करणाऱ्या शिक्षकांचे नियमित वेतनासाठी संचालनालय स्तरावरुन अनुदान उपलब्ध होते. | -- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | खाजगी शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते सेवानिवृत्ती नंतरचे व इतर लाभ अधिनियम १९७७ नियम ४(१) नुसार विहित करण्यात येतात. एखाद्या कर्मचाऱ्याकडून असे वेतन व लाभ मागणार नाही असे प्रतिज्ञापत्र लिहून घेता येईल किंवा कसे? याबाबत मार्गदर्शन व्हावे. | संस्थेच्या अंतर्गत कामकाजात शिक्षण उपसंचालक कार्यालय अथवा शिक्षणाधिकारी हस्तक्षेप करु शकत नाही. | -- | -- |
| ८ | १२ वर्षाची अर्हता नागरी सेवा झाल्या नंतर वरिष्ठ/निवड श्रेणीबाबत होण्यासाठी कोणकोणत्या संस्थामार्फत देण्यात येणारे प्रशिक्षण ग्राह्य धरता येते.असे प्रशिक्षण वर्ग केव्हा आयोजित केले जातात. राष्ट्रीय पातळीवर अथवा राज्य स्तरावरील कोण कोणत्या संस्था असे प्रशिक्षण वर्ग आयोजित करतात त्यांची यादी मिळावी. | दि. २६ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयामध्ये याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.<br>सर्व शिक्षणाधिकारी यानी उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ९ | शिक्षण संस्थामधील अंतर्गत वादाचे प्रकरण (बदली अर्ज) मे धार्मादाय आयुक्त यांचेकडे निवाडयासाठी प्रलंबित असतांना व सदर संस्थेत कोण अधिकृत पदाधिकारी आहेत याबाबत भाष्य करता येत नाही असा मे धार्मादाय उप आयुक्त यांचा अभिजात असतांना कोणाचा पत्रव्यवहार अधिकृत मानता येईल किंवा कसे? | रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये असे संस्थांतर्गत वादाचे प्रकरणे बऱ्याच प्रमाणात असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.<br>संस्थेच्या अंतर्गत कामकाजात शिक्षण उपसंचालक कार्यालय अथवा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हस्तक्षेप करु शकत नाही. मनमानी कारभार करणाऱ्या शाळांवर प्रशासक नियुक्तीबाबत कार्यवाही करणेची शिफारस या कार्यालयाला करता येईल. प्रशासक नियुक्तीबाबत शासन निर्णय दि. १५/१०/२०१२ तसेच शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे पत्र दि. १२/०२/२०१४ मध्ये कार्यपध्दती देण्यात आलेल्या आहेत. | -- | -- |
| १० | श्री. सोमनाथ विद्यालय हिंडगाव, ता. चंदगड या शाळेची शै. वर्ष २०१२-१३ ते शै.वर्ष २०-१५-१६ च्या संशयित संच मान्यतेबाबत/वैयक्तिक मान्यतेबाबत | -- | | |
| ११ | मा. शिक्षण संचालक क्रमांक ४१७९/३२३१० क महाराष्ट्र शासन पुणे १ दि. ०८/०१/१९८८ च्या आदेशानुसार सेवाज्येष्ठतेबाबतचा वाद न्यायप्रविष्ट असताना सेवाजेष्ठता डावलून झालेल्या पदोन्नत्यांना मान्यता देता येईल किंवा कसे? श्री. गौडाडकर या सेवाजेष्ट शिक्षकाचा प्रस्ताव प्रलंबित ठेवून अन्य सेवा कनिष्ठांचे प्रस्ताव मान्य करता येईल किंवा कसे? प्रभारी मान्यता देण्यात काय अडचण आहे? | शिक्षणाधिकारी यांनी महाराष्ट खाजगी शाळा कर्मचारी सेवेच्या शर्ती १९८१ व १९७७ अधिनियम तसेच वेळोवेळी निर्गमित शासन निर्णय विचारात घेवून कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | शिक्षण संचालनालयाकडील क्र.अमाशा ४१८२/१६९००/क दि.५ फेब्रुवारी १९८८ बाबत धोरण स्पष्ट व्हावे. | महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार मुख्याध्यापक पदासाठी शैक्षणिक पात्रता ही बी.एड. आहे.<br>बी.एड ही शैक्षणिक पात्रता नसलेल्या शिक्षकांना मुख्याध्यापक पदी पदोन्नती दिलेली अशी प्रकरणे असतील अशा प्रकरणांची माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करावी. याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात येईल. | -- | -- |
| ➢ | **आयत्या वेळचे विषय** | | | |
| ■ | उच्च माध्यमिक कडील शिष्यवृत्तीबाबत | अनुदानित माध्यमिक शाळेला विनाअनुदानित उच्च माध्यमिक यांचा शालार्थ आयडी एकच आहे. अनुदानित माध्यमिक शाळेच्या शालार्थ आयडीवर उच्च माध्यमिक च्या शिष्यवृत्तीची माहिती भरली जाते. या शिष्यवृत्ती मिळाताना ते अनुदानित माध्यमिक शाळेच्या दराने मिळातात. उच्च माध्यमिक शाळांना विनाअनुदानित दराने शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे. यासाठी उच्च माध्यमिकसाठी स्वतंत्र शालार्थ आयडी मिळावा अथवा उच्च माध्यमिकच्या शिष्यवृत्तीसाठी वेगळे नियोजन करावे.<br>याबाबत संघटनेने सविस्तर निवेदन द्यावे. ते तात्काळ वरिष्ठ कार्यालयास मार्गदर्शनासाठी सादर करणेत येईल. | -- | -- |
| ➢ | **सर्वसाधारण सूचना** | | | |
| | संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येईल. | संघटना स्तरावर | -- |

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर